महाराष्ट्र पोलीस

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत
नयानगर पोलीस ठाणे
पत्ता:- रसाज इन्क्लेव्ह बिल्डींग,एअरशाईन,मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे, पिन नं-४०११०७
Mail ID :-pi.nayanagar.mb-vv@mahapolice.gov.in Phone No ०२२-२८११११२२, ८६५५७२७५९८

| जावक क्र 16561 /२०२५ | | दि. 23/09/२०२५ |
|---|---|---|

प्रति,

मा. आयुक्त सो.
मिराभाईंदर महानगरपालिका, भाईंदर पश्चिम,
जिल्हा ठाणे, यांना सविनय सादर..

मिरा - भाईंदर महानगर पालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
आ. क्र. ........
दाखल ता. 25/9/2025
आयुक्त

रिपोर्ट : विजय वाघमारे, सहा. पोलीस निरीक्षक, नेमणुक मिरारोड पोलीस स्टेशन.
विषय :बेवारस अनोळखी मयताचे नातेवाईकांचे वारसांचा तपास होणेकामी दवंडी पिटविणेबाबत..

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, नयानगर पोलीस स्टेशन अ.मृ. रजि.नंबर ५२/२०२५, कलम १९४ भा.ना.सु.सं.२०२३ प्रमाणे दि. २३/०९/२०२५ रोजी ०२.०५ वा. नोंद आहे.



मयताचे नाव पत्ता व वर्णन :यातील खबर देणार यांनी खबर दिली की, यातील खबर देणार हे घरी असताना त्यांना नगरसेवक अनिल विराणी यांनी फोन करुन फोनवर सांगीतले की, तुमच्याकडे काम करणारा ' शिवा ' नावाचा इसम हा कोटक बँकेच्या बाजुला फुटपाथवर पडलेला आहे, तुम्ही या असे सांगीतल्याने खबर देणार हे लागलीच कोटक बँकेजवळ गेले असता शिवा हा फुटपाथवर निपचीत अवस्थेत पडलेला दिसला त्यास खबर देणार यांनी उठविण्याचा प्रयत्न केला असता त्याची काहीएक हालचाल होत नव्हती त्यामुळे खबर देणार यांनी सदरबाबत पोलीसांनी माहीती दिली त्यानंतर सदर इसमास ॲम्बुलन्सने टेंभा हॉस्पीटल येथे पाठवुन दिले असता तेथील डॉक्टरांनी शिवा यास तपासुन दिनांक २३/०९/२०२५ रोजी ०१.०५ वाजता दाखल पुर्व मयत घोषीत केले आहे वगैरे मजकुरावरुन दाखल

सदर मयत इसम हा शांती विहार, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे येथे फुटपाथवर राहत होता.सदर मयताचे प्रेत हे टेंभा हॉस्पीटल येथे शीतगृहात राखुन ठेवले असुन प्रेत ताब्यात देणेकामी नातेवाईकांचा शोध होणे आवश्यक आहे तरी सदर बेवारस अनोळखी मयताचे नातेवाईकांचा शोध होणेकामी दवंडी पिटविण्यास विनंती आहे

संपर्क क्रमांक - मो.नं. ८६५५७२७५९८, ८२०८९९७५०८

मार्फत सादर,
मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
नयानगर पोलीस ठाणे.

मा.सविनय सादर

( विजय वाघमारे )
सहा.पोलीस निरीक्षक,
नयानगर पोलीस ठाणे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
नयानगर पोलीस ठाणे
मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय